ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.


LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २३ जानेवारी, १९६३ | अंक १



## प्रत्येक व्यक्ति म्हणजे एक सैनिक – प्रत्येक कार्य म्हणजे युध्दकार्य

आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्याकरतां आपसांतील सर्व मतभेद विसरून आपण एकजुटीनें कार्य केले पाहिजे. प्रत्येक नागरिकानें स्वतांला सैनिक समजून सैनिकी शिस्तीनें काम करणें आवश्यक आहे. मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा कसल्याही व्यवसायांत काम करणारा असो. आपले शूर सैनिक ज्याप्रमाणें डोळ्यांत तेल घालून आपल्या सरहद्दीचे रक्षण करीत आहेत त्याचप्रमाणें कृतनिर्धाराने आपण आपले कर्तव्य बजाविले पाहिजे. लेखणी असो कि नांगर असो, कारखान्यांतील यंत्र असो किंवा छोट्या उद्योगधंद्यातील कामाचे हत्यार असो–ह्या प्रत्येकाचा योग्य तो उपयोग करून आपण आपले प्रयत्न वाया जाऊं देता कामा नयेत. अंतिम विजय आपलाच आहे




संचालक, प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.


LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २३ जानेवारी, १९६३ | अंक २



## प्रत्येक व्यक्ति म्हणजे एक सैनिक - प्रत्येक कार्य म्हणजे युध्दकार्य

आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्याकरतां आपसांतील सर्व मतभेद विसरून आपण एकजुटीनें कार्य केले पाहिजे. प्रत्येक नागरिकानें स्वतांला सैनिक समजून सैनिकी शिस्तीनें काम करणें आवश्यक आहे. मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा कसल्याही व्यवसायांत काम करणारा असो. आपले शूर सैनिक ज्याप्रमाणें डोळ्यात तेल घालून आपल्या सरहद्दीचे रक्षण करीत आहेत त्याचप्रमाणें कृतनिर्धाराने आपण आपले कर्तव्य बजाविले पाहिजे. लेखणी असो कि नांगर असो, कारखान्यांतील यंत्र असो किंवा छोट्या उद्योगधंद्यातील कामाचे हत्यार असो-ह्या प्रत्येकाचा योग्य तो उपयोग करून आपण आपले प्रयत्न वाया जाऊं देता कामा नयेत. अंतिम विजय आपलाच आहे



**प्रयत्नांचा हिमालय उभा करा**

संचालक, प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई

## दक्षिण भारतांतील औद्योगिक शक्तीचा उपयोग


नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेनें औद्योगिक शक्तीच्या वापराच्या दृष्टीनें दक्षिण भारतामधील ४ राज्यांची पहाणी केली आहे. हीं राज्यें म्हणजे आंध्र, मद्रास, केरळ व म्हैसूर हीं होत. ह्या पहाणीवरून असें दिसतें कीं, भारतांत जितक्या औद्योगिक शक्तीचा वापर केला जातो त्याच्या फक्त १२·७ टक्केच वापर वरील राज्यांतून करण्यांत येतो. ह्या राज्यांची लोकसंख्या मात्र देशाच्या एकूण लोकसंख्येच्या २५·४ टक्के आहे. अखिल भारतांत औद्योगिक व बिगर–औद्योगिक अशा स्वरूपाची एकूण जितकी शक्ति वापरण्यांत येते तिच्या २२·२ टक्के इतकीच शक्ति दक्षिण भारतांत उपयोगांत आणण्यांत येते. दक्षिण भारतांत औद्योगिक इंधनांची आयात इतर राज्यांतून व परदेशांतून करण्यांत येत असते. दक्षिण भारतांत औद्योगिक शक्तीचें जेवढें उत्पादन करण्यांत येतें त्याच्या १५० टक्के शक्ति बाहेरून आणावी लागते. सर्व भारताच्या बाबतीत हें आयातीचें प्रमाण २० टक्केच आहे. भारताच्या एकूण औद्योगिक शक्तींत जलविद्युत् शक्तीचें जितकें प्रमाण आहे, त्याच्या पेक्षा दक्षिण भारतामधील जलविद्युत् शक्तीचें प्रमाण बरेंच अधिक आहे. तरी सुद्धां दक्षिण भारतामधील औद्योगिक शक्तीच्या एकूण खपांत विजेचा हिस्सा १० टक्केच आहे. दक्षिण भारतामधील औद्योगिक शक्तीच्या खपांत पेट्रोलजन्य शक्तीचें प्रमाण सर्वांत अधिक म्हणजे ४७ टक्के आहे. भारतामधील इतर कोणत्याहि विभागापेक्षा दक्षिण भारतांत होणाऱ्या कोळशाच्या खपाचें प्रमाण कमी आहे.

## उत्तर प्रदेशांतील दारूबंदी शिथिल केली

उत्तर प्रदेशांतील ११ जिल्ह्यांत संपूर्ण दारूबंदी अंमलांत होती. परंतु आता सर्व राज्यांत फक्त बुधवारींच दारूबंदी अंमलांत राहणार आहे. त्याशिवाय आणखी कांहीं दिवस दारूबंदीसाठी निवडण्यांत आले आहेत. ते सर्व धरून राज्यांत वर्षातील ५७ दिवस दारूबंदी अंमलांत राहील. दारूबंदीसाठी जादा म्हणून निवडलेले दिवस २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर, दिवाळी व होळीचे सण असे आहेत. दारूबंदी संपूर्णपणें उठविण्यापेक्षा राज्याच्या गरजेप्रमाणें त्याची पुनर्घटना करण्यांत येत आहे असें राज्यसरकारचें म्हणणें आहे. दारूबंदीच्या कार्यक्रमांत बदल केल्यामुळें राज्याला १·७५ कोटी रुपये उत्पन्न होईल.

## ५ कोटी सोविएत लोकांचे बँक-अकौंट

सोविएत लोकसंख्येपैकी पाव हिस्सा लोकांची (५ कोटी, ३० लक्ष लोकांची) बँकांमध्यें बचत खातीं आहेत आणि त्यांच्या नांवें एकूण १२ अब्ज, ५० कोटी रूबल जमा आहेत. १९४७ सालीं ही रक्कम १ अब्ज, ३० कोटी रूबल इतकी होती. जनतेच्या वाढत्या कमाईचें हें प्रत्यंतर होय असें सरकारी बचत बँकाच्या मुख्य मंडळामार्फत जाहीर करण्यांत आलें आहे. ही बचत-रक्कम या वर्षअखेरपर्यंत १०० कोटींनीं वाढेल अशी अपेक्षा आहे.




## जपानच्या मदतीनें खताचा नवा कारखाना

उत्तर प्रदेशांतील गोरखपूर येथें जपानच्या मदतीनें खताचा कारखाना काढण्यासंबंधींचीं बोलणीं गेलीं दोनतीन वर्षें चालू होतीं. हीं बोलणीं नुकतीच यशस्वी झालीं असून जपान प्लँट असोसिएशन आणि फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्यांच्या दरम्यान आतां लवकरच जरूर तो करार करण्यांत येईल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व इतर साधनें जपान पुरविणार असून त्याची किंमत सुमारें २·०५ कोटी डॉलर्स होईल. ह्या कारखान्यांतून दररोज ३५० टन अमोनिआचें उत्पादन करण्यांत येईल. जपाननें भारताला जें कर्ज देऊ केलेलें आहे त्यामधून कारखान्याची किंमत देण्यांत येणार आहे. अशा प्रकारचा इतका मोठा कारखाना जपानमधून परदेशांत निर्यात करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. कारखान्याच्या तांत्रिक बाजूबाबतहि जपानकडून साह्य मिळणार आहे. प्रथम पांच वर्षें कारखान्याच्या किंमतीची फेड मुळींच करण्यांत येणार नाहीं. त्यानंतर १० वार्षिक हप्त्यांत किंमतीची फेड करण्यांत यावयाची आहे. १९६३ च्या प्रारंभीं कारखान्याच्या उभारणीस सुरुवात होईल आणि ती पूर्ण होण्यास तीन वर्षांचा अवधी लागेल असा अंदाज आहे. उभारणीच्या कामांत निरनिराळीं कामें करणारे ९ प्रमुख जपानी कारखाने सहकार्य देणार आहेत. रासायनिक खत निर्माण करणारा आग्नेय आशिआंतील हा दुसऱ्या क्रमांकाचा कारखाना होईल. अशाच प्रकारचा एक कारखाना जपाननें ह्यापूर्वी पूर्व पाकिस्तानांत उभारला आहे. त्या कारखान्याची रोजची उत्पादनक्षमता २०० टन अमोनिआची आहे.

## १०० मेगॅटन शक्तीचा संहारक अणुबाँब

पूर्व जर्मनीच्या कम्युनिस्ट पक्षाच्या काँग्रेसमध्यें भाषण करतांना रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव ह्यांनीं असें सांगितलें कीं, रशिआनें १०० मेगॅटन शक्तीचा अणुबाँब तयार केला आहे. एवढ्या मोठ्या बाँबचा स्फोट करण्यांत आला तर जगांतील ७० ते ८० कोटी लोक प्राणाला मुकतील. अशा स्फोटामुळें रशिआ, अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, इटली, चीन, भारत आणि जपान इतक्या देशांतील लोकांची प्राणहानि होईल. समाजवादाचा प्रसार करण्याचें साधन म्हणून रशिआ युद्धाचा विचार करीत नाहीं. त्याचा प्रसार करण्याचें युद्ध हें एकमेव साधन आहे असें नाहीं. समाजवादी देशांत मतभेद असूं शकतील. परंतु असे मतभेद कायम स्वरूपाचे नाहींत. कोणताहि मतभेद अगर भांडण ह्यांचा निकाल वाटाघाटींनेंच लागला पाहिजे; युद्धानें नव्हे.

## गोल्ड कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष, श्री. कोटक

गोल्ड कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष, श्री. गिरधरलाल कोटक हे राजकोट येथें ६४ वर्षांपूर्वी जन्मले. त्यांच्या फर्मची ओसाका (जपान) येथें शाखा आहे. दरसाल लक्षावधि गांठी कपाशीची त्यांची फर्म निर्गत करीत असे. त्यांची पत्नी व मुलें जपानी भाषेंत बोलूं शकतात. ओसाका येथें असतांना त्यांनीं कल्चर्ड पर्ल्सचा अनुभव मिळवून तेथून हे मोतीं निर्गत करूं लागले. कराची येथें ते काँग्रेसचे एक कार्यकर्ते होते.

## साठे कंपनीची निर्गत

डिसेंबर, १९६२ अखेर साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. नें १½ लक्ष रु. ची परदेशी हुंडणावळ भारताला मिळवून दिली. ४२ हजार रु. चीं बिस्किटें मध्य-पूर्वेकडील देशांकडे निर्गत केलीं आणि १,०३,७०० रु. चे कोकोचे जिन्नस इंग्लंड–ऑस्ट्रेलियाकडे पाठवले.

# अर्थ

बुधवार, ता. २३ जानेवारी, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपन्यांच्या संचालकांविषयीं पहाणी

भारत सरकारच्या कंपनी लॉ ॲड्मिनिस्ट्रेशन खात्याच्या संशोधन आणि आंकडे विभागानें मोठ्या व्यापारी कंपन्यांच्या संचालकांविषयीं कांहीं माहिती जमवून नुकतीच एक पहाणी केलेली आहे. ह्या माहितीच्या साह्यानें मोठमोठ्या कंपन्यांच्या संचालकांच्या वयाविषयी व त्यांच्या तांत्रिक ज्ञानासंबंधीं मनोरंजक व उद्बोधक प्रकाश पडतो. खात्यातर्फे १,३२० डायरेक्टरांसंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करण्यांत आली आहे. त्यांपैकी १,११० हिंदी आहेत आणि २१० परदेशीय आहेत. हिंदी डायरेक्टरांचें सरासरी वय परदेशीय डायरेक्टरांच्या सरासरी वयापेक्षा थोडें अधिक आढळून येतें. हिंदी डायरेक्टरांचें सरासरी वय ४८ वर्षें २ महिने तर परदेशीय डायरेक्टरांचें सरासरी वय ४७ वर्षें १ महिना आहे. तथापि ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांचें प्रमाण हिंदी डायरेक्टरांच्या पेक्षा बरेंच कमी आहे, भारतीय कंपन्यांत डायरेक्टर असलेल्या व ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी ११·५ आहे. तर हिंदी डायरेक्टरांची टक्केवारी जवळजवळ दुप्पट म्हणजे २२·९ टक्के इतकी आहे. उलटपक्षीं ४० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या हिंदी डायरेक्टरांची टक्केवारी २६·१ इतकी आहे, तर परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी २१·४ इतकी आहे. एकूण डायरेक्टरांच्या संख्येंत वयस्कर हिंदी डायरेक्टरांचें प्रमाण जसें अधिक आहे, त्याचप्रमाणें तरुण डायरेक्टर्सचें प्रमाणहि अधिक आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, हिंदी कंपन्यांनीं वयस्कर डायरेक्टरांच्या अनुभवाचा जसा फायदा घेतला त्याचप्रमाणें तरुण डायरेक्टरांना जबाबदाऱ्या उचलण्याच्या संधीहि दिल्या आहेत.

अमेरिकेंतील व ब्रिटनमधील कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या वयांची हिंदमधील कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या वयाशीं तुलनाहि पहाणींत करण्यांत आली आहे. अमेरिकेंत डायरेक्टरांपैकी बहुतेक ६० वर्षें वयाच्या पुढील आहेत. अशा डायरेक्टरांची टक्केवारी ६३ टक्के आहे. ब्रिटनमधील डायरेक्टरांचें प्रमाण अवघें ३० टक्के आहे. अमेरिकन डायरेक्टरांपैकी १ टक्क्यापेक्षा अधिक डायरेक्टर्स ४० वर्षें वयापेक्षा कमी वयाचे नाहींत. ब्रिटिश डायरेक्टरांचें हेंच प्रमाण ९ टक्के आहे. ह्यावरून अमेरिकेंत तरुण वयाचे लोक डायरेक्टरच्या जागेला लायक समजले जात नाहींत असें दिसतें. हिंदी कंपनींत काम करणाऱ्या व ४० पेक्षा कमी वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी २१·४ आहे तर खुद्द ब्रिटनमध्यें अशा डायरेक्टरांची टक्केवारी ९ टक्केच आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. ह्यावरून भारतांत तरुण डायरेक्टरांवर अधिक विश्वास टाकण्यांत येतो असें दिसतें. भारतामधील वाढतें औद्योगीकरण लक्षांत घेतां तरुण पिढीवरील हा भार समजण्यासारखा आहे.

हिंदी डायरेक्टरांच्या तांत्रिक भूतकालाविषयीं खात्यानें जमा केलेली माहिती अशी आहे. १,५०२ डायरेक्टरांविषयीं माहिती गोळा करण्यांत आली. त्यांपैकी ११६ तांत्रिक विषयासंबंधीं कामें करणारे होते, १७३ कारभारविषयक अधिकाराचीं कामें करणारे होते, १०३ हिशोबनवीस व वकील होते. बाकीच्या १,११० डायरेक्टर्सना कोणतीच तांत्रिक पार्श्वभूमि नव्हती. ते पिढीजाद धंदेवाले व व्यापारी होते.

---

## लोकरीचें उत्पादन वाढविण्याची योजना

भारतांतील चांगल्या दर्जाच्या लोकरीचें उत्पादन वाढविण्यासाठी संयुक्त-राष्ट्र संघटनेच्या खास निधीच्या साह्यानें एक योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेच्या अंमलबजावणीला लोकरीच्या पुढील हंगामापासून प्रारंभ करण्यांत येणार असून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या उरलेल्या कालावधींत योजनेवर सुमारें ३ कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. भारतांत दरसाल सुमारें ७ कोटी पौंड वजनाची लोकर निर्माण करण्यांत येते. लोकर निर्माण करण्याच्या बाबतींत राजस्थान राज्य सर्व राज्यांच्या आघाडीवर आहे. लोकरीच्या एकूण उत्पादनापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक उत्पादन उत्तर भारतामधील कोरड्या थंड हवेच्या प्रदेशांत होतें. ह्या प्रदेशांत मुख्यतः राजस्थान, पंजाबचा कांहीं भाग, उत्तर प्रदेशाचा कांहीं भाग आणि उत्तर गुजरात ह्या भागांचा समावेश होतो. लोकरीची कापणी करतांना दर्जाप्रमाणें तिची वर्गवारी करण्याची पद्धत नाहीं. त्यामुळें कमी प्रतीच्या लोकरीची व चांगल्या प्रतीच्या लोकरीची सरमिसळ करण्यांत येते. अशा तऱ्हेची भेसळ लोकरच निरनिराळ्या व्यापारी नांवानें निर्यात करण्यांत येते. लोकरीची प्रतवारी ठरवून चांगल्या जातीच्या मेंढ्यांपासून लोकर निर्माण करणाऱ्या कळपांच्या मालकांना उत्तेजन देण्यांत आलें नाहीं. तर ह्या धंद्याचा विकास परिणामकारक रीतीनें करतां येणार नाहीं. धंद्याचा विकास करण्यासाठी राजस्थानांत प्राथमिक तयारी करण्यांत आलेली आहे. परंतु जरूर तें संशोधन करणें, लोकरीची प्रतवारी ठरविणें, चांगल्या जातीच्या मेंढ्यांची पैदास करणें, इत्यादि कामें आतां संघटित रीत्या करण्यांत येणार आहेत.

---

## परदेशीय चलनांत झालेली बचत

मुंबईतील बर्माशेल कंपनीच्या १९६२ मधील उत्पादनामुळें भारताला परदेशीय चलनाच्या खर्चांत ११·५२ कोटी रुपयांची बचत करतां आली. ह्या कारखान्याची उत्पादनक्षमता २० लाख टनांची करण्याची आणि १ लाख टन वंगणाचें तेल तयार करण्याचा नवा कारखाना काढण्याची योजना कंपनीनें मध्यवर्ती सरकारकडे पाठविली आहे. ही योजना सरकारनें मान्य केली तर दरसाल आणखी ९·५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. १९५५ सालीं कंपनीचा तेलशुद्धीचा कारखाना सुरू झाला. तेव्हांपासून तेलाच्या आयातीपोटीं होणाऱ्या खर्चांत ६६·६३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली आहे.

---

# अर्थ

बुधवार, ता. २३ जानेवारी, १९६३





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## कंपन्यांच्या संचालकांविषयीं पहाणी

भारत सरकारच्या कंपनी लॉ अॅड्मिनिस्ट्रेशन खात्याच्या संशोधन आणि आंकडे विभागानें मोठ्या व्यापारी कंपन्यांच्या संचालकांविषयीं कांहीं माहिती जमवून नुकतीच एक पहाणी केलेली आहे. ह्या माहितीच्या साह्यानें मोठमोठ्या कंपन्यांच्या संचालकांच्या वयाविषयी व त्यांच्या तांत्रिक ज्ञानासंबंधीं मनोरंजक व उद्‌बोधक प्रकाश पडतो. खात्यातर्फे १,३२० डायरेक्टरांसंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करण्यांत आली आहे. त्यांपैकी १,११० हिंदी आहेत आणि २१० परदेशीय आहेत. हिंदी डायरेक्टरांचें सरासरी वय परदेशीय डायरेक्टरांच्या सरासरी वयापेक्षा थोडें अधिक आढळून येतें. हिंदी डायरेक्टरांचें सरासरी वय ४८ वर्षे २ महिने तर परदेशीय डायरेक्टरांचें सरासरी वय ४७ वर्षे १ महिना आहे. तथापि ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांचें प्रमाण हिंदी डायरेक्टरांच्या पेक्षा बरेंच कमी आहे, भारतीय कंपन्यांत डायरेक्टर असलेल्या व ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी ११·५ आहे. तर हिंदी डायरेक्टरांची टक्केवारी जवळजवळ दुप्पट म्हणजे २२·९ टक्के इतकी आहे. उलटपक्षी ४० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या हिंदी डायरेक्टरांची टक्केवारी २६·१ इतकी आहे, तर परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी २१·४ इतकी आहे. एकूण डायरेक्टरांच्या संख्येंत वयस्कर हिंदी डायरेक्टरांचें प्रमाण जसें अधिक आहे, त्याचप्रमाणें तरुण डायरेक्टर्सचें प्रमाणहि अधिक आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, हिंदी कंपन्यांनीं वयस्कर डायरेक्टरांच्या अनुभवाचा जसा फायदा घेतला त्याचप्रमाणें तरुण डायरेक्टरांना जबाबदाऱ्या उचलण्याच्या संधीहि दिल्या आहेत.

अमेरिकेंतील व ब्रिटनमधील कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या वयांची हिंदमधील कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या वयाशीं तुलनाहि पहाणींत करण्यांत आली आहे. अमेरिकेंत डायरेक्टरांपैकीं बहुतेक ६० वर्षे वयाच्या पुढील आहेत. अशा डायरेक्टरांची टक्केवारी ६३ टक्के आहे. ब्रिटनमधील डायरेक्टरांचें प्रमाण अवघें ३० टक्के आहे. अमेरिकन डायरेक्टरांपैकीं १ टक्क्यापेक्षा अधिक डायरेक्टर्स ४० वर्षे वयापेक्षा कमी वयाचे नाहींत. ब्रिटिश डायरेक्टरांचें हेंच प्रमाण ९ टक्के आहे. ह्यावरून अमेरिकेंत तरुण वयाचे लोक डायरेक्टरच्या जागेला लायक समजले जात नाहींत असें दिसतें. हिंदी कंपनींत काम करणाऱ्या व ४० पेक्षा कमी वय असलेल्या परदेशीय डायरेक्टरांची टक्केवारी २१·४ आहे तर खुद्द ब्रिटनमध्यें अशा डायरेक्टरांची टक्केवारी ९ टक्केच आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. ह्यावरून भारतांत तरुण डायरेक्टरांवर अधिक विश्वास टाकण्यांत येतो असें दिसतें. भारतामधील वाढतें औद्योगीकरण लक्षांत घेतां तरुण पिढीवरील हा भार समजण्यासारखा आहे.

हिंदी डायरेक्टरांच्या तांत्रिक भूतकालाविषयीं खात्यानें जमा केलेली माहिती अशी आहे. १,५०२ डायरेक्टरांविषयीं माहिती गोळा करण्यांत आली. त्यांपैकी ११६ तांत्रिक विषयासंबंधीं कामें करणारे होते, १७३ कारभारविषयक अधिकाराचीं कामें करणारे होते, १०३ हिशोबनवीस व वकील होते. बाकीच्या १,११० डायरेक्टर्सना कोणतीच तांत्रिक पार्श्वभूमि नव्हती. ते पिढीजाद धंदेवाले व व्यापारी होते.

## लोकरीचें उत्पादन वाढविण्याची योजना

भारतांतील चांगल्या दर्जाच्या लोकरीचें उत्पादन वाढविण्यासाठी संयुक्त-राष्ट्र संघटनेच्या खास निधीच्या साह्यानें एक योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेच्या अंमलबजावणीला लोकरीच्या पुढील हंगामापासून प्रारंभ करण्यांत येणार असून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या उरलेल्या कालावधींत योजनेवर सुमारें ३ कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. भारतांत दरसाल सुमारें ७ कोटी पौंड वजनाची लोकर निर्माण करण्यांत येते. लोकर निर्माण करण्याच्या बाबतींत राजस्थान राज्य सर्व राज्यांच्या आघाडीवर आहे. लोकरीच्या एकूण उत्पादनापैकीं ५० टक्क्यांपेक्षा अधिक उत्पादन उत्तर भारतामधील कोरड्या थंड हवेच्या प्रदेशांत होतें. ह्या प्रदेशांत मुख्यतः राजस्थान, पंजाबचा कांहीं भाग, उत्तर प्रदेशाचा कांहीं भाग आणि उत्तर गुजरात ह्या भागांचा समावेश होतो. लोकरीची कापणी करतांना दर्जाप्रमाणें तिची वर्गवारी करण्याची पद्धत नाहीं. त्यामुळें कमी प्रतीच्या लोकरीची व चांगल्या प्रतीच्या लोकरीची सरमिसळ करण्यांत येते. अशा तऱ्हेची भेसळ लोकरच निरनिराळ्या व्यापारी नांवानें निर्यात करण्यांत येते. लोकरीची प्रतवारी ठरवून चांगल्या जातीच्या मेंढ्यांपासून लोकर निर्माण करणाऱ्या कळपांच्या मालकांना उत्तेजन देण्यांत आलें नाहीं. तर ह्या धंद्याचा विकास परिणामकारक रीतीनें करतां येणार नाहीं. धंद्याचा विकास करण्यासाठी राजस्थानांत प्राथमिक तयारी करण्यांत आलेली आहे. परंतु जरूर तें संशोधन करणें, लोकरीची प्रतवारी ठरविणें, चांगल्या जातीच्या मेंढ्यांची पैदास करणें, इत्यादि कामें आतां संघटित रीत्या करण्यांत येणार आहेत.

## परदेशीय चलनांत झालेली बचत

मुंबईतील बर्माशेल कंपनीच्या १९६२ मधील उत्पादनामुळें भारताला परदेशीय चलनाच्या खर्चांत ११·५२ कोटी रुपयांची बचत करतां आली. ह्या कारखान्याची उत्पादनक्षमता २० लाख टनांची करण्याची आणि १ लाख टन वंगणाचें तेल तयार करण्याचा नवा कारखाना काढण्याची योजना कंपनीनें मध्यवर्ती सरकारकडे पाठविली आहे. ही योजना सरकारनें मान्य केली तर दरसाल आणखी ९·५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. १९५५ सालीं कंपनीचा तेलशुद्धीचा कारखाना सुरू झाला. तेव्हांपासून तेलाच्या आयातीपोटीं होणाऱ्या खर्चांत ६९·६३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली आहे.

**नवी औद्योगिक वसाहत**—हुबळी-धारवाड म्युनिसिपल कार्पोरेशननें ह्या दोन शहरांच्या दरम्यान एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेसाठी १३ लाख रुपये खर्च येणार आहे. हुबळी-धारवाड रस्त्याच्या दोन्ही बाजूला अर्धा मैल पर्यंत कॉर्पोरेशनची हद्द वाढविण्यांत आली आहे. इमारती वाटेल तशा बांधल्या जाऊं नयेत म्हणून ही दक्षता घेण्यांत आली आहे.

**रिहंद जलविद्युत् योजना**—रिहंद नदीवर बांधलेल्या धरणांतील पाण्याच्या साहाय्यानें एका केंद्रांत जलविद्युत् निर्माण करण्यास प्रारंभ झाला आहे. ह्या केंद्रासाठी ४६ कोटी रुपये खर्च आला असून, वीज व पाणी ह्यांची फार टंचाई असलेल्या भागाचा विकास होण्यास त्यामुळें चांगली मदत होणार आहे. पाण्याचा साठा करणारे हे भारतामधील सर्वात मोठें कृत्रिम तळें आहे.

**नाताळ सणासाठी सरबराई**—पीकिंगमधील लोकांना नाताळच्या सणानिमित्त मांस, मासे, अंडीं, इत्यादि खाद्यपदार्थांचा जादा पुरवठा करण्यांत आला. हा पुरवठा पदरांत पाडून घेण्या साठी पीकिंगमधील वांटपकेंद्रें व दुकानें ह्यांच्यासमोर चिनी-गृहिणींच्या लांब रांगा लागलेल्या होत्या.

**अणुतज्ज्ञांना शिकविण्याचा करार**—फ्रेंच अणुविज्ञान-विषयक संघटनांतून पाकिस्तानच्या शास्त्रज्ञांना व एंजिनिअर्सना शिक्षण देण्याबाबत उभयता देशांत करार करण्यांत आला आहे. त्या शिवाय किरणोत्सर्गी द्रव्यांची, तज्ज्ञांची आणि शास्त्रज्ञांची देवाण-घेवाण करण्याचेंहि उभयता देशांनीं ठरविलें आहे.

**यंत्रानें चालणाऱ्या सायकली**—एंजिनांच्या साहाय्यानें चालणाऱ्या सायकलींची भारताची गरज अजमावण्यासाठी आर्थिक संशोधनाच्या राष्ट्रीय मंडळानें एक पाहणी केली आहे. पाहणी वरून असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं १९६५-६६ अखेर दरसाल ५०,००० यंत्रचलित सायकली निर्माण करण्यांत आल्या तरच गरज भागूं शकेल. दरसाल १५,००० यंत्रचलित सायकली निर्माण होतील इतक्याच कारखान्यांना परवाने मिळा-लेले आहेत.

**हाँगकाँगशीं होणारा व्यापार**—गेल्या कांहीं महिन्यांत भारताच्या हाँगकाँगशीं होणाऱ्या व्यापारांत भारत आयातीपेक्षा निर्यात अधिक करीत असल्याचें आढळून आलें आहे. १९६२ च्या पहिल्या तिमाहींत भारतानें १९६१ च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेनें ५० लाख हाँगकाँग डॉलर्सचा अधिक माल निर्यात केला. निर्यातींत पोर्ती, लाख, लोखंड व पोलाद ह्यांचा समावेश आहे.

**स्काय बोल्ट रद्द केल्याचा परिणाम**—'स्काय बोल्ट' ह्या नांवाचें एक प्रक्षेपणास्त्र अमेरिका ब्रिटनमध्यें तयार करीत होती. परंतु आतां हें अस्त्र तयार करण्याचें रद्द करण्यांत आलें आहे. त्यामुळें जनरल इलेक्ट्रिक कंपनीमधील १,२०० आणि डग-लस एअरक्रॅफ्ट फॅक्टरींतील ४,००० हजार कामगार बेकार होणार आहेत.

**रशिआला कच्च्या तागाची निर्यात**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडून रशिआला फक्त कमी प्रतीचा ताग पुर-विण्यासच परवानगी होती. परंतु आतां पुरवठ्यापैकीं ५० टक्के ताग अधिक चांगल्या प्रतीचा पुरविण्यांत येणार आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

जें धर्मजात आघवें । युगायुगीं मर्या रक्षावें ।
ऐसा ओघु हा स्वभावें । आद्यु असे ॥ —श्रीज्ञानेश्वरी

**************

★ भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो ★

***********

भारतावर आलेलें परचक्र आपल्या बळावर व हिंमतीवर निवारण होईल. त्यासाठी सर्व आघाडीवर अधिक उत्पादन आवश्यक आहे. आमच्या कारखान्यांतून जास्तींत जास्त उत्पादन वाढवून देश बलवान् करण्यांतील आमचा वांटा आम्ही उचलीत आहोंत.

संचालक मंडळ

**श्री. शं. ल. लिमये,** बी. एस्सी., एलएल्. बी., वकील.
अध्यक्ष.

श्री. भ. ग. भाडुले, बी. एस्सी. एल्एल्. बी., वकील
श्री. रा. भा. देशमुख, एम्. ए., एल्एल्. बी. (कँटब), बार-ॲट-लॉ, एम्. पी.
श्री. वि. कृ. साठे, बी. ए. (टिळक), माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य

श्री. ग. ह. सवनीस
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो. न. जोशी, बी. एस्सी.

श्री. गो. श्री. वाळिंबे, बी. कॉम्.,
ऑफिसिएटिंग मॅनेजर.

# सुवर्ण-नियंत्रणाची योजना

## चार यक्ष प्रश्न

नऊ जानेवारीला रात्रीं साडेआठ वाजतां अर्थमंत्र्यांनीं आकाशवाणीवरून सुवर्ण-नियंत्रण-नियमांची घोषणा केली आणि त्याच दिवशीं मध्यरात्रीपासून त्यांची अंमलबजावणीहि सुरू झाल्यानें दुसऱ्या दिवशींच्या सोनेखरेदीसाठीं 'गुरुपुष्यमुहूर्ताची' वाट बघत बसलेल्या अनेकांची दारुण निराशा झाली. त्या दिवसापासून सोन्याच्या खरेदीविक्रीऐवजी नव्या नियंत्रणाची चर्चा मात्र जोरांत सुरू झाली आहे.

### सुवर्ण-नियंत्रणाचे यक्ष-प्रश्न

या सुवर्णनियंत्रणाचें स्वरूप काय आहे हें आतां सर्वसामान्य जनतेला माहीत झालेलेंच आहे. ( १ ) दागिन्याव्यतिरिक्त यापुढें कुठल्याहि सज्ञान व्यक्तीला ५० ग्रॅम व अज्ञान व्यक्तीला २० ग्रॅम सोन्यापेक्षा जास्त सोनें, सरकारला जाहीर न करतां, अन्य स्वरूपांत वा चोख चिपांत, नाण्यांत वगैरे जवळ ठेवतां येणार नाहीं. ( २ ) असें सोनें ज्याजवळ असेल त्याला तो सांठा ३० दिवसांत सरकारला कळवावा लागेल. ( ३ ) परवाना असल्याखेरीज यापुढें कुठल्याहि सराफाला सोन्याची खरेदीविक्री करतां येणार नाहीं. ( ४ ) परवानगी घेतल्याखेरीज कुठल्याहि सोनाराला यापुढें १४ कॅरटपेक्षा जास्त सोनें असलेले दागिने करतां येणार नाहींत आणि खरेदीदारालाहि यापुढें असें दागिनें करून घेतां येणार नाहींत. अशी सर्वसाधारणपणें या नियमांची चौकट आहे. या सुवर्णनियंत्रणाची आवश्यकता होती का, आणि असल्यास त्याची चौकट नीट आंखली गेली आहे का, तिची अंमलबजावणी कशी काय होईल व या नियंत्रणाचा अप्रत्यक्ष परिणाम काय होईल हे चार यक्षप्रश्न या बाबतींत सहजपणेंच सामान्य माणसाच्या नजरेसमोर येतात.

### सुवर्ण-रोख्यांची योजना

बारा नोव्हेंबरला श्री. मोरारजीभाई देसाई यांनीं सुवर्णरोख्यांची विक्री सुरू केली आणि 'सोन्याची खरेदी हा देशद्रोह आहे तेव्हां सुवर्णरोखे खरेदी करा' असें जनतेला आवाहन केलें. अशा रोख्यापोटीं दिलें जाणारें सोनें कुठून आलें याची चौकशी केली जाणार नाहीं असें आश्वासनहि त्याच वेळीं देण्यांत आलेलें आहे. तरीदेखील गेल्या दोन महिन्यांत या रोख्यांना योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाहीं हें या रोख्यांची विक्री सर्व भारतांत फक्त ७० लक्ष रुपयांचीच झाली आहे यावरून सिद्ध झालेलें आहे. भारतांत जवळजवळ आंतरराष्ट्रीय किंमतीप्रमाणें २,००० कोटि रुपयांचें किंवा सध्यांच्या भारतीय किंमतीप्रमाणें ४,००० कोटि रुपयांचें सोनें आहे असा पूर्वी एक अंदाज व्यक्त केला गेला होता व हें सोनें राष्ट्राच्या उभारणीसाठीं कसें उपयोगांत आणतां येईल याबद्दल चर्चाहि झाली होती. पंचवार्षिक योजनेसाठी सरकारनें लोकांजवळील हें सोनें रोख्याच्या स्वरूपांत कर्जाऊ घ्यावें व कांहीं वर्षानंतर त्या रोख्यांची परतफेड सोन्यांतच करावी म्हणजे रोखेधारकाला कुरकुरीचें कारण राहणार नाहीं, असें त्या वेळीं प्रतिपादलें गेलें होतें. पण आजच्याच अर्थमंत्र्यांनीं त्यावेळेला, म्हणजे १९५८ सालीं, असा उपाय हा प्रत्यक्ष रोगापेक्षाहि वाईट ठरेल असें सांगितलें होतें. १९६२ सालीं जाहीर केलेल्या रोख्यांचा विषय एका दृष्टीनें चार वर्षांपूर्वी चर्चिला गेला होता.

### नियंत्रणाची सदोष चौकट

सुवर्णरोख्यांच्या या अपयशामुळें सरकारचें दुसरें कांहींतरी हत्यार बाहेर येणार अशी जनतेंत कल्पना होतीच. सुवर्णरोखे जाहीर झाल्यावर सोन्याच्या किंमती खालीं येतील असा सरकारचा अंदाज होता व तो अनेक अंदाजांप्रमाणें खोटा पडला होता व त्यामुळें या नियंत्रणाबाबत तसा फारसा धक्का बसण्याइतकें अनपेक्षित कांहीं नव्हतें. सोन्याची किंमत आंतरराष्ट्रीय पातळीवर आणणें व चोरट्या सोन्याच्या आयातीला प्रतिबंध करणें ही या वेळीहि नियंत्रणामागची कल्पना आहे असें सांगितलें गेलें. त्याबद्दल मात्र जाणकार व्यक्तींत चर्चा सुरू होणें अपरिहार्य झालें.

या नियंत्रणाची जी चौकट आंखली गेली आहे ती संपूर्णपणें सदोष आहे यांत सरकारखेरीज कुणालाहि शंका नाहीं. सोन्याच्या खरेदीपासून भारतीय जनतेला परावृत्त करणें आवश्यक आहे यांत संदेह नाहीं. पण तो उद्देश नुकत्याच करण्यांत आलेल्या नियमांनीं साध्य होणारा नाहीं. पाश्चिमात्यांपेक्षा आपल्याकडे सोन्याचें 'वेड' दांडगें आहे हें खरें; तें जर कमी केलें तर सोन्याच्या किंमतींत फरक पडूं शकेल. सध्यां बाहेरून सोनें आणण्यास बंदी आहेच आणि कोलारच्या खाणींतील सोनेंहि बाहेर विक्रीसाठी नाहीं. त्यामुळें सर्व मागणीचा ताण देशांत उपलब्ध असलेल्या सोन्यावरच पडत आहे व त्यामुळें किंमती वाढत आहेत; म्हणून कोणी सोनें खरेदी करावयाचे थांबलें नाहीं. अश्लाघ्य मार्गानें मिळालेला पैसाहि सोन्यामध्येंच गुंतवला जातो. पण या गोष्टी ताज्या नियंत्रणानें टाळणें साध्य होणार नाहीं. सोन्याचे दागिने नियंत्रणमुक्त ठेवण्यांत आले आहेत; त्यामुळें ज्यांनीं सोन्यांत बराच पैसा ठेवलेला आहे ते लोक खासगी रीत्या सराफाला घरीं बोलावून त्या लगडीचे या तीस दिवसांत अवैधरीत्या कंबरपट्टे, गोठ, पाटल्या, अशा भारी दागिन्यांत परिवर्तन करून घेतील हें सरकारच्या लक्षांत आलें नसेल का?

### दागिन्यांचा काळाबाजार

भारतीय जनतेवर २२–२३ कॅरट सोन्याच्या दागिन्यांचाच प्रभाव आहे. तिची ही आवड कमी करण्यासाठी १४ कॅरटचे तांसडे दागिने प्रसृत करणें इष्ट ठरेल असें सरकारला वाटत आहे; तेंहि कितपत बरोबर ठरेल याबद्दल शंका आहे. त्यामुळें २२–२३ कॅरटच्या सध्याच्या दागिन्यांचा काळाबाजार सुरू होईल हें सूर्यप्रकाशाइतकें सत्य आहे. दारुबंदी सुरू झाल्यावर हातभट्टीची जशी चलती सुरू झाली त्याचप्रमाणें शुद्ध दागिनेबंदीचा हा नवीन प्रयोग सुरू झाल्यावर एक नवीन बेकायदा धंदा अस्तित्वांत येईल. सध्याचे दागिने जर नियंत्रणाखालीं येऊं शकत नाहींत तर नवीन दागिन्यांबद्दलच एवढा आकस बाळगण्याचें कारण नाहीं. कारण सध्यां अस्तित्वांत असलेल्या २००० कोटि रु. किंमतीच्या सोन्यापैकी तीनचतुर्थांश सोनें दागिन्यांत आतांच आहे; मग प्रत्यक्ष किती सोन्यावर नियंत्रण या नियमान्वयें येणार आहे? नवीन दागिने करतांना सध्यां कांहीं दोनशें-पांचशें तोळ्यांचे दागिने केले जात नाहींत. मध्यमवर्ग व गरीबवर्ग लग्नाच्या, मुंजीच्या, बारशाच्या वेळीं, दोन, पांच, दहा तोळे सोनें दागिन्यांत घालतो. त्याला या नियमांची जास्ती झळ बसणार आहे. दागिने नियंत्रणाखालीं न आल्यामुळें या नियमांचा रोख मूठभर श्रीमंतवर्गावर-ज्यांचीं ताटें, वाट्यापासून चहादाणी, ते चिपामध्यें सोनें साठवून ठेवलें आहे त्यांच्यावर आहे असें सरकारी गोटांतून सांगितलें जात आहे; पण तें तितकेंसें खरें नाहीं. नियंत्रणच आणावयाचें होतें तर तें दागिन्यांवरहि हवें होतें. पण तशा नियंत्रणाला कम्युनिझमचा वास येईल म्हणून तें त्या स्वरूपांत आणलें गेलेलें नाहीं हें उघडच आहे.

### खेड्यांत गहाण-कर्जाची अडचण

दुसरें म्हणजे अशा दागिन्यांतून हजार–पांचशें रुपयांची गुंत-

वणूक करणारा सध्यांचा गरीब नि मध्यमवर्ग त्या दागिन्यांकडे अडीअडचणींत उपयोगी पडणारी वस्तु म्हणून बघतो. वेळ पडल्यास गहाण ठेवून ज्यावर खेड्यांतसुद्धां पैसे मिळूं शकतील अशी ही किडुकमिडुक स्वरूपाची छोटीशी गुंतवणूकहि त्यांच्याकडून आतां हिरावली जात आहे. कारण १४ कॅरटच्या दागिन्यांवर त्याला आतां गहाणकर्ज मिळूं शकणार नाहीं. खेड्यांपाड्यांतून अजून बँकिंगचा व्यापक प्रसार झाला नसतां ही सवलतहि त्यांना बंद होणार आहे व त्यायोगें कदाचित खेड्यांपाड्यांतल्या शेतीवरहि परिणाम होईल. खेड्यांतले सावकार अशा व्यवहारांत शेतकऱ्याला नाडतात हें मान्य असूनहि वेळ पडली तर निदान या सोनें-गहाण कर्जाचा मार्ग तरी त्यांना मोकळा होता हें विसरून चालणार नाहीं. दागिन्यांतली गुंतवणूक ही एका दृष्टीनें चलनवाढीच्या दुष्परिणामाला प्रतिबंध करणारी असते. विकसित देशांत सर्व चलनांचा उपयोग आर्थिक घडामोडींसाठी होऊं शकतो तसा तो विकासशील देशांत होणार नाहीं. आज सोन्याच्या खरेदींत जी कांहीं रक्कम दरवर्षाला गुंतवली जात आहे ती जर मोकळी झाली व अन्य वस्तूंचा अपुरा पुरवठा असतां बाजारांत आली तर त्यायोगें अन्य वस्तूंच्या किंमती वाढतील, यांत शंका नाहीं. खूपशा प्रमाणांत वस्तूंचें उत्पादन उपलब्ध झाल्यावरच असा पैसा बाहेर येणें इष्ट ठरेल.

### चोरटी निर्यात वाढेल

सोन्याच्या नव्या दागिन्यांवर बंदी आल्यानें यापुढें त्यामुळें मोडणाऱ्या लग्नांचें प्रमाण कमी होईल असें म्हटलें जात आहे पण तेंहि सर्वथैव खरें नाहीं. यापुढें सालंकृत कन्यादानाची मागणी न होतां चांदीच्या चौरंगाची आणि चांदीच्या चहादाणीची मागणी होत जाईल. लग्नांत वधूपक्षानें कांहींतरी दिलें पाहिजे ही भूमिका जोंपर्यंत आपल्याकडे आहे तोंपर्यंत हुंडाबंदी काय किंवा दागिनेबंदी काय कुठलाहि कायदा वधूपित्याच्या व्यावहारिक मदतीला येऊं शकणार नाहीं.

या सुवर्ण-नियंत्रण नियमामुळें आतांपर्यंत भारतांत सोन्याची जी चोरटी आयात चालू आहे तिचें रूपांतर चोरट्या निर्यातींत होण्याचा संभव वाढला आहे. कारण पाकिस्तानमध्येंहि सोन्याचा भाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नाहीं. अशा चोरट्या व्यवहारास सरकार परिणामकारकपणें आळा घालूं शकत नाहींच; उलट त्यामुळें लांचलुचपतीसारख्या गोष्टींनाहि उत्तेजन मिळतें हें विसरून चालणार नाहीं. सरकारला आज जर खंबीर पावलें टाकायचीं असतील तर असे व्यवहार करणाऱ्या देशद्रोही व्यक्तींस अत्यंत कडक शिक्षा ठोठावणें हेंच अपरिहार्य ठरेल. नेमक्या याच बाबतींत सरकार उदासीन राहत आहे आणि नुकत्याच निघालेल्या अर्धवट प्रकारच्या सुवर्णनियंत्रण-नियमांसारख्या प्रकारानें अशा गोष्टींना अप्रत्यक्षपणें जास्त उत्तेजन देत आहे. अशा गोष्टी वाढत्या प्रमाणांत होत राहिल्यानें समंजस माणसाचा कायद्याबद्दलचा आदर राहत नाहीं. 'माहीत आहे दारूबंदीचें काय झालें तें' 'भाववाढ रोखण्याचें काय झालें तें' अशा हेटाळणीच्या स्वरूपांत तो आपलें मतप्रदर्शन करीत असतो. कारण त्याखेरीज त्याच्या हातांत करण्यासारखें जास्त कांहीं नसतें.

### सोनें बाळगण्यावर कर

मग या सर्व परिस्थितीवर इलाज काय? असा प्रश्न यानंतर विचारला गेल्यास तो अस्थानीं ठरणार नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे भारतांतील सुवर्णसांठ्याचा नेमका अंदाज कुणीच सांगू शकत नाहीं. तो २००० कोटी रु. ( आंतरराष्ट्रीय किंमतीनुसार ) असावें हा अंदाज कसा केला आहे याबद्दल खुलासा करण्यांत आलेला नाहीं. दुसरें म्हणजे यांतील पन्नास टक्के सोनेंहि सरकारला मिळालें तरी त्यानें कायमचा प्रश्न न सुटतां दोन-पांच वर्षांनंतर तो जास्तच भेसूर व भेडसावणारा ठरेल. स्टर्लिंग गंगाजळी आटल्यानंतर आज जें दृश्य निर्माण झालें आहे, त्याचीच सुधारलेली आवृत्ति सुवर्णसंचय संपल्यावर पुढील काळांत निघेल. वाढत्या प्रमाणांत निर्यात हा एकच तोडगा दीर्घ मुदतीच्या उपाययोजनेंत पडूं शकतो. त्याची इथें चर्चा अभिप्रेत नाही पण प्राप्त परिस्थितींत आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी अल्प मुदतीचे उपाय कुठले याचा सरकारनें गंभीर विचार करून त्याप्रमाणें योजना आखली पाहिजे. सुवर्णरोख्यांची सोन्यांतच मुदतीनंतर परतफेड हा सर्वांत सोपा उपाय आहे; त्याखेरीज सोनें बाळगण्यावर नियंत्रण न ठेवतां त्यावर लायसेन्स स्वरूपाचा प्रत्यक्ष कर आकारणें हा दुसरा यशस्वी, कमी खर्चाचा, लांचलुचपतीस वाव न देणारा व समाजपुरुषास न दुखवणारा मार्ग ठरेल. त्यायोगें कुणालाहि कुठल्याहि स्वरुपांत सोनें बाळगण्यास हरकत नाहीं, व दरवर्षी रेडियो परवान्याप्रमाणें एक फॉर्म भरून त्या वर्षीचें सोनें जाहीर करावें असा दंडक घालावा व दर तोळ्यास दर वर्षास एक रुपयाप्रमाणें कर आकारावा. यामुळें निदान अंतर्गत उत्पन्नांत तरी चांगलीच भर पडेल.

### सुवर्ण-परवानापद्धतीच इष्ट

आज भारतांत सुमारें ३५० कोटी तोळे सोनें आहे हा जो अंदाज केला जातो तो कितपत खरा आहे त्याचाहि उलगडा या मार्गानें होईल व निदान १०० ते १५० कोटी रुपयांचें वार्षिक उत्पन्न सरकारला त्यायोगें मिळूं शकेल. सोनें जवळ ठेवण्यासाठी अगदीं गरीबांतला गरीब मनुष्यसुद्धां हा कर देण्यास राजी होईल. अर्थात् रेडियो, मोटार, याप्रमाणें सुवर्णपरवान्यांत अमकी वस्तू अमक्याचीच आहे असें ओळखण्यासाठी दाखवणें कठीण पडेल. पण सोन्याला धक्का लागणार नाहीं, या जाणिवेनें व बरोबर सोनें जाहीर न केल्यास आणि जास्ती सोनें जवळ सांपडल्यास शिक्षा होऊन सोनें जप्त होईल या भीतीमुळें मनुष्य असा कर शक्यतों नीटपणें भरील. एकदां सुवर्णपरवाना घेतल्यावर रेडियोप्रमाणेंच त्यांत बदल झाल्यास, त्याचा योग्य पुरावा दिल्यास त्याला त्रास दिला जाणार नाहीं अशीहि जनतेची खात्री पटल्यास तिचें सहकार्य जास्त चांगलें मिळेल व केवळ फॅशन म्हणून त्याच दोनपांच तोळयांचें, आज शकुंतला हौशीनें महिला हार, उद्या दमयंती कर्णभूषणें असें जें परिवर्तन करतात तें चालूच राहून सोनारी धंद्यावरहि संक्रांत येणार नाहीं. त्या दृष्टीनें सुवर्णस्वामित्व परवान्याचा व सुवर्णकराचाच सरकारनें जरूर विचार करावा व तुटपुंज्या सोन्याचा 'विदेशविनिमय' स्वरूपांत उपयोग करण्याऐवजीं विदेशविनिमयासाठी निर्यातीचीच कांस धरावी व सोन्याच्या सांठ्यामुळें चलनवाढीला जरा तरी दाब बसतो याची दखल घ्यावी हेंच इष्ट ठरेल. नाहींतर दारूबंदीप्रमाणें सुवर्णबंदीचा प्रयोग फसल्याचें सरकारला बघावें लागेल आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या नवीन भस्मासुरांना तोंड द्यावें लागेल.

—( श्री. वसंत पटवर्धन, " केसरी " १६–१–६२ )

**चीननें जिंकलेला मुलूख**— ८ सप्टेंबर, १९६२ नंतर केलेल्या आक्रमणामुळें चीननें भारताचा २,५०० चौरस मैल मुलूख नव्यानें व्यापलेला आहे. ह्या मुलखाचा विस्तार न्यूयॉर्क शहराच्या आठपट आणि हाँगकाँग ह्या ब्रिटिश वसाहतीच्या सहापट आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## पूर्वरचित घरांचें उत्पादन

संरक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी दिल्ली येथील पूर्वरचित घरांच्या कारखान्यांचें उत्पादन ५ पटीनें वाढविण्यांत येणार आहे. त्यासाठी हिंदुस्थान हौसिंग फॅक्टरींत जादा यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे. त्याशिवाय घरांचे उत्पादन जलद व्हावें म्हणून कांहीं तांत्रिक सुधारणाहि करण्यांत येत आहेत. कारखान्यांत २० टनांच्या दोन याऱ्या लवकरच बसविण्यांत येतील.

## सिकिममधील रस्तेबांधणीचा कार्यक्रम

सिकिमच्या सरकारनें आपल्या सप्तवार्षिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ३०० मैल लांबीचे रस्ते पुरे केले आहेत. सिकिम हें राज्य अविकसित असल्यानें त्याच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत रस्ते करण्याला विशेष महत्त्व देण्यांत आलेलें आहे. मोटारी व जीप्स जाण्यासारखे रस्ते तर केले आहेतच; परंतु मुख्य रस्त्यांना जोडणारे दुय्यम रस्तेहि बनविण्यांत आले आहेत. नव्या रस्त्यांमुळें अनेक दुर्गम भाग व्यापाराला खुले झाले असून तेथील व्यापारी पिकें बाजारांत आणण्याची सोय झाली आहे. सिकिममधील बहुतेक महत्त्वाचे रस्ते व पूल भारत सरकारच्या बांधकाम खात्यातर्फे तयार करण्यांत येत आहेत. चीनच्या भारतावरील आक्रमणामुळें ह्या रस्त्यांना वेगळें महत्त्व आलें आहे.

## उत्पादनक्षमता पूर्ण वापरली जात नाहीं

केरळ राज्यांतील उद्योगधंद्यांच्या उत्पादनक्षमतेपैकी ३० टक्के उत्पादनक्षमता वापरली जात नाहीं असें अधिकृतरीत्या सांगण्यांत येत आहे. कच्च्या मालाचा तुटवडा, पैशाची टंचाई व मागणीचा अभाव, अशीं कारणें ह्या बाबतींत पुढें करण्यांत येत आहेत. काजूगरांचा धंदा हा केरळमधील प्रमुख धंदा असून त्यामुळें परदेशीय चलनाची प्राप्ति होते. पण काजूच्या कारखान्यांतील ४८ टक्के उत्पादनक्षमता वापरण्यांत येत नाहीं. चहाच्या कारखान्यांना पुरेशी पत्ती मिळत नसल्यानें त्यांचीहि २५ टक्के उत्पादनक्षमता वाया जात आहे.

## यंदा रशियाकडे १¼ कोटी रु. च्या पादत्राणांची निर्यात

स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशन १९६३ मध्यें रशियाकडे सुमारें १·२५ कोटी रुपये किंमतीचे पादत्राणांचे पांच लक्ष जोड निर्यात करणार आहे. भारताकडून पादत्राणें खरेदी करण्याची तयारी पूर्व जर्मनीनेंहि दाखविली आहे.

तसेंच, रशियाकडे १७·५ लक्ष रुपये किंमतीच्या हस्तकला वस्तु निर्यात करण्याबाबतहि भारत व रशिया यांमध्यें एक अंतिम करार झाला आहे,

रशियाकडे ३० लक्ष मीटर व पूर्व जर्मनीकडे २४ लक्ष मीटर सुती कापड पाठविण्याबाबतच्या वाटाघाटीहि पूर्ण झाल्या आहेत, व रशियाकडे आणखी २० लक्ष मीटर सुती कापड पाठविण्याबाबत वाटाघाटी चालू आहेत..

## पन्ना येथील हिऱ्यांची विक्री

पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींतील हिऱ्यांचे लिलाव गेल्या महिन्यांत सुरू करण्यांत आले. तेव्हांपासून उद्योगधंद्यांत वापरण्यांत येणाऱ्या ८०,५०० रुपये किंमतीच्या खड्यांची विक्री करण्यांत आली. ह्या खाणींत ४८·५ कॅरेट वजनाचा 'विजय' नामक हिरा सांपडला असून त्याला ४८ पैलू आहेत. ह्या मोठ्या हिऱ्याचा लिलांव लंडनमधील जवाहर बाजारांत होण्याचा संभव आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.


श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें
१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०
२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गिरगांव, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च

शेड्यूल्ड बँकांच्या नफ्याचें एकूण उत्पन्नाशीं पडणारें प्रमाण १९५२ मध्यें २३.९% होतें, तें १९५८ मध्यें १४.३% वर उतरलें; हळूहळू वाढत जाऊन तें १९६१ मध्यें २२.६% झालें. खालील तक्त्यांत १९६१ ची १९५२ शीं तुलना केली आहे:—

१९५२ व १९६१ मधील उत्पन्न (आंकडे कोटी रु.)

| | १९५२ | | १९६१ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % | रक्कम | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % |
| कर्जें व बिलें ह्यांचें उत्पन्न | ३०.६ | ६४.२ | ८२.७ | ६५.३ |
| इन्व्हेस्टमेंटवरील व्याज | ९.० | १८.९ | २०.६ | १६.३ |
| इतर बँकांतील ठेवीवरील व्याज | ०.२ | ०.४ | २.४ | १.९ |
| इतर सर्व्हिस चार्जेस | ७.८ | १६.४ | २०.५ | १६.२ |
| वसुली, इ. | ०.१ | ०.२ | ०.४ | ०.३ |
| एकूण उत्पन्न | ४७.७ | १००.० | १२६.६ | १००.० |

१९५२ व १९६१ मधील खर्च

| | रक्कम | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % | रक्कम | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| दिलेलें व्याज | १३.० | २७.५ | ४८.५ | ३८.३ |
| एस्टॅब्लिशमेंट खर्च | १६.५ | ३४.६ | ३५.८ | ३८.३ |
| इतर चालू खर्च | ५.६ | ११.७ | ११.४ | ९.० |
| कर, तत्सम देणीं | ०.४ | ०.८ | ०.८ | ०.६ |
| जिंदगीवरील घसारा | ०.८ | १७ | १.४ | १.१ |
| एकूण खर्च | ३६.३ | ७६.१ | ९८.० | ७७.४ |

### बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउस

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमधून १९६२ मध्यें देवघेव झालेल्या चेक्सचा तुलनात्मक तपशील खाली दिला आहे :—

| वर्ष | चेक्सची संख्या | रक्कम (रु.) | प्रत्येक चेकची सरासरी रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १९६१ | १,९९,३९,४५६ | ४८,१२,४८,४१,००० | २.४१४ |
| १९६२ | २,१५,२९,४३७ | ५१,४५,६२,२२,००० | २.३९० |

### मोकळ्या जागा सरकार घेणार

पश्चिम बंगालमधील शहरानजीक असलेल्या, बांधकामाला उपयोगी पडण्यासारख्या मोकळ्या जागा राज्यसरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. जमिनीच्या किंमती भरमसाट वाढत चालल्यानें घरें बांधण्यासाठी जागा मिळणें दिवसेंदिवस मुष्किलीचें होत चालल्यामुळें सरकारला हा उपाय योजावा लागत आहे. प्रथम कलकत्ता, असनसोल व सिलगुरी ह्या शहरानजीकच्या जमिनी ताब्यांत घेण्यांत येतील.

**नेपाळमधील विद्युत्-केंद्र**—नेपाळमध्यें बांधण्यांत येणाऱ्या त्रिशूल जलविद्युत्-केंद्राच्या जागेची पाहणी करण्यासाठी भारतीय तज्ज्ञांचें मंडळ खाटमांडूला गेलें होतें. हें केंद्र उभारण्यासाठी भारत १० कोटी रुपये मदत देणार आहे. १९६५ सालीं तें पूर्ण होईल व त्यांत २०,००० किलोवॅट वीज तयार होईल.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०.५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :—३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षें—४½ टक्के, ३ वर्षें—४¾ टक्के, ४ वर्षें—५ टक्के, ५ वर्षें—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा-विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,३५,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

## दि मुरगूड सहकारी बँक लि.,

स्थापना : १९४७ ] मुरगूड [ र. नं. १८३३१

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. १,२५,७५० |
| फंडस् | रु. १,१८,८४७ |
| ठेवी | रु. ३,२५,४१४ |
| खेळतें भांडवल | रु. ७,५०,०२० |

★

★ आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
★ योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★

विश्वनाथराव हरीभाऊ पाटील, प्रेसिडेंट.

बी. डी. कल्याणकर, मॅनेजर.

## पश्चिम जर्मनीची भारताला मदत

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या चालू वर्षासाठी पश्चिम जर्मनीचे सरकार भारताला ५५·९ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. उभयता देशांच्या प्रतिनिधींनी ह्यासंबंधींच्या करारावर कांहीं दिवसांपूर्वी सह्या केल्या. ह्या कर्जातील कांहीं भाग पश्चिम जर्मनीच्या साह्यानें उभारण्यांत आलेल्या रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहे. कांहीं भारत–जर्मनी ह्यांच्या सहकार्यानें उभारल्या गेलेल्या कारखान्यासाठी औद्योगिक कच्चा माल व यंत्रसामग्रीचे सुटे भाग आयात करण्यासाठी केला जाणार आहे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामग्रीहि त्यांतून आयात केली जाईल. पश्चिम जर्मन सरकारनें भारताला आतांपर्यंत ३४२·४१ कोटी रुपयांची मदत केली आहे.

## निर्यातीसाठी कच्च्या साखरेचें उत्पादन

१९६२-६३ सालांत निर्यातीसाठी २ लाख टन कच्ची साखर निर्माण करण्याचें ठरविण्यांत आले आहे. ही निर्मिति करण्याचें काम ३० साखर कारखान्यांकडे सोपविण्यांत आले आहे. आतांपर्यंत २९,००० टन कच्ची साखर उत्पादन करण्यांत आली आहे. १४ साखर कारखान्यांनीं त्यांच्या वांट्याची कच्ची साखर उत्पादन केली आहे; बाकीच्यांनीं ती निर्माण करण्यास प्रारंभ केला आहे.

## अमेरिकन शस्त्रास्त्रांची किंमत रुपयांत देणार

भारतावर चीननें आक्रमण केल्यावर अमेरिकेनें जी शस्त्रास्त्रांची तांतडीची मदत पाठविली तिची किंमत रुपयाच्या चलनांत देण्यांत येणार आहे. भारताची लष्करी ताकद वाढविण्यासाठी दीर्घ कालापर्यंत लष्करी स्वरूपाची मदत लागणार आहे. परंतु अशी मदत देण्यापूर्वी अमेरिकन सरकारला अमेरिकन काँग्रेसची संमति घ्यावी लागेल. भारताचें विमानदल अधिक बलशाली करण्याची गरज अमेरिका, ब्रिटन, कॅनडा इत्यादि देशांना पटली आहे. अमेरिकेकडून राडार आणि इतर आधुनिक संरक्षण साहित्य मिळण्याची शक्यता आहे.

## साखरेच्या धंद्यापुढें संकटाची छाया

इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या प्रतिनिधीमंडळानें अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांची भेट घेऊन बहुतेक साखरेचे कारखाने आर्थिक दृष्ट्या आंतबट्ट्याचे होत चालल्याचें सांगितलें. त्याशिवाय गुळाला चांगला भाव असल्यानें साखरकारखान्यांना गळितासाठी ऊंस मिळणें कठीण जात असल्याचेंहि अन्नमंत्र्यांच्या निदर्शनास आणण्यांत आलें. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत साखरेच्या किंमती वाढत असून त्यांचा फायदा घेण्यासाठी भारतामधील साखरेचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता आहे. परंतु नेमक्या ह्याच वेळीं साखरेच्या उत्पादनांत घट होण्याची शक्यता उत्पन्न झाली असल्याबद्दल प्रतिनिधीमंडळानें चिंता व्यक्त केली आहे.



### पश्चिम जर्मनीची भारताला मदत

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या चालू वर्षासाठी पश्चिम जर्मनीचे सरकार भारताला ५५·९ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. उभयता देशांच्या प्रतिनिधींनी ह्यासंबंधींच्या करारावर कांहीं दिवसांपूर्वीं सह्या केल्या. ह्या कर्जांतील कांहीं भाग पश्चिम जर्मनीच्या साह्यानें उभारण्यांत आलेल्या रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहे. कांहीं भारत–जर्मनी ह्यांच्या सहकार्यानें उभारल्या गेलेल्या कारखान्यासाठी औद्योगिक कच्चा माल व यंत्रसामग्रीचे सुटे भाग आयात करण्यासाठी केला जाणार आहे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामग्रीहि त्यांतून आयात केली जाईल. पश्चिम जर्मन सरकारनें भारताला आतांपर्यंत ३४२·४१ कोटी रुपयांची मदत केली आहे.

---

### निर्यातीसाठी कच्च्या साखरेचें उत्पादन

१९६२-६३ सालांत निर्यातीसाठी २ लाख टन कच्ची साखर निर्माण करण्याचें ठरविण्यांत आले आहे. ही निर्मिति करण्याचें काम ३० साखर कारखान्यांकडे सोपविण्यांत आले आहे. आतांपर्यंत २९,००० टन कच्ची साखर उत्पादन करण्यांत आली आहे. १४ साखर कारखान्यांनीं त्यांच्या वांट्याची कच्ची साखर उत्पादन केली आहे; बाकीच्यांनीं ती निर्माण करण्यास प्रारंभ केला आहे.

### अमेरिकन शस्त्रास्त्रांची किंमत रुपयांत देणार

भारतावर चीननें आक्रमण केल्यावर अमेरिकेनें जी शस्त्रास्त्रांची तांतडीची मदत पाठविली तिची किंमत रुपयाच्या चलनांत देण्यांत येणार आहे. भारताची लष्करी ताकद वाढविण्यासाठी दीर्घ कालापर्यंत लष्करी स्वरूपाची मदत लागणार आहे. परंतु अशी मदत देण्यापूर्वी अमेरिकन सरकारला अमेरिकन काँग्रेसची संमति घ्यावी लागेल. भारताचें विमानदल अधिक बलशाली करण्याची गरज अमेरिका, ब्रिटन, कॅनडा इत्यादि देशांना पटली आहे. अमेरिकेकडून राडार आणि इतर आधुनिक संरक्षण साहित्य मिळण्याची शक्यता आहे.

---

### साखरेच्या धंद्यापुढें संकटाची छाया

इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या प्रतिनिधीमंडळानें अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांची भेट घेऊन बहुतेक साखरेचे कारखाने आर्थिक दृष्ट्या आंतबट्ट्याचे होत चालल्याचें सांगितलें. त्याशिवाय गुळाला चांगला भाव असल्यानें साखरकारखान्यांना गळितासाठी ऊंस मिळणें कठीण जात असल्याचेंहि अन्नमंत्र्यांच्या निदर्शनास आणण्यांत आलें. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत साखरेच्या किंमती वाढत असून त्यांचा फायदा घेण्यासाठी भारतामधील साखरेचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता आहे. परंतु नेमक्या ह्याच वेळीं साखरेच्या उत्पादनांत घट होण्याची शक्यता उत्पन्न झाली असल्याबद्दल प्रतिनिधीमंडळानें चिंता व्यक्त केली आहे.



### जबलपूरसाठीं नवा ध्वनिक्षेपक

जबलपूर रेडिओ केंद्रासाठी आणण्यांत आलेला ५० किलो-वॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक आतां तेथें बसविण्यांत येणार नाहीं. नेफा भागांत संरक्षणकार्यांत त्याची अधिक आवश्यकता असल्यानें तो तिकडे पाठविण्यांत आला आहे. हा ध्वनिक्षेपक एका जपानी कंपनीकडून घेतलेला होता. जबलपूर केंद्रासाठी आतां २० किलोवॅट शक्तीचा नवा ध्वनिक्षेपक आणविला जाईल.

### गंगेच्या खोऱ्यांत तेलाचा शोध

भारताचें तेल आणि नैसर्गिक वायु-मंडळ आणि इ. एन्. आय. ही इटालिअन कंपनी ह्यांनीं गंगेच्या खोऱ्यांत खनिज तेलाचा शोध करण्याविषयींच्या करारावर सह्या केल्या आहेत. ह्या कामासाठीं सुमारें ३ कोटी रुपये लागतील. ह्या रकमेंत परदेशीय चलनांतील रकमेचाहि समावेश आहे. इटालिअन कंपनीनें भारताशीं १९६० मध्यें केलेल्या कराराप्रमाणें पेट्रोलविषयक प्रकल्पासाठी ४६ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलेलें आहे.

### हिंदच्या कापडाला रशिआंत वाव

स्त्रियांच्या वापरांत असणाऱ्या छपाई केलेल्या कापडाला रशिआंत चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊं शकेल. जगांतील कांहीं बाजारपेठांतून हिंदी कापडाला रशिअन कापडाशीं स्पर्धा करावी लागत असली तरी सॅटिन, पॉपलिन, सारख्या कापडाला रशिआंत चांगला वाव आहे. चालू वर्षी रशिआ भारताकडून १ कोटी मीटर कापड घेण्याची शक्यता आहे. रशिआनें १९५२ सालीं प्रथम भारतामधील कापड आयात केले. गेल्या वर्षी भारतानें २०,०००मीटर कापड रशिआला निर्यात केले. रशिआ चीन, हंगेरी व इतर कम्युनिस्ट देश ह्यांच्याकडून कापड आयात करीत असे. परंतु १९६० सालीं ह्या आयातींत एकदम खूप घट झाली. १९६० सालीं चीनकडून १० कोटी मीटर कापड आयात करण्यांत आलें होतें. १९६१ सालीं अदर्धे २.४ कोटी मीटर कापड आयात करण्यांत आलें.

### मुंबई बंदराचें दळणवळण

मुंबई बंदराच्या विकास आणि आधुनिकीकरण योजनांवर १९६१-६२ मध्यें १ कोटी, १३ लक्ष रु. वर खर्च करण्यांत आला, असें या बंदराच्या सदर वर्षाच्या कारभारविषयक अहवालावरून दिसून येतें. अहवालाच्या या वर्षात पोर्ट ट्रस्टला १४०८·३१ लाख रु. उत्पन्न झालें व ( १९६०-६१ चा हा आंकडा १२७३·६३ लाख रु. ) १००२·८५ लाख रु. निव्वळ खर्च आला ( १९६०-६१ चा हा आंकडा ९३३·३४ लाख रु.) म्हणजे ४०५·४६ लाख रु. शिल्लक राहिली. राखीव निधींत या वर्षअखेर २७·३५ कोटी रुपये होते.

सदर वर्षांत मुंबई बंदरांतून १,४५,४८,००० टन मालाची उलाढाल झाली त्यांत १,०४,१३,००० टन आयात माल होता.

या वर्षांत परदेशचे १,७१,००० उतारू या बंदरीं आले आणि देशांतील ६,८९,००० उतारूंची किनारी वाहतूक झाली. त्याचप्रमाणें या वर्षांत एकूण ३०,१९० बोटींनीं या बंदरांतून ये-जा केली. १४४ बोटींनीं सुक्या गोदीचा लाभ घेतला. मागील वर्षाचा हा आंकडा १४१ होता.

या वर्षांत पोर्ट ट्रस्टनें नोकरवर्गावर ६०४ लाख रुपये खर्च केला. त्यामागील वर्षाचा हा आंकडा ५५१·७२ लाख रुपये होता.


कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीची छपाई पूर्ण होत आली असून पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.

: प्रकाशक :

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनवार पुणें २.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी :
९, बेंक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं.२५५४७४-७५. २८३१६.

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईंतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ८७ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ०५ लाख |
| ठेवी | ... | १५ कोटी ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६१ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, चिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.



## भारताच्या व्यापारी संबंधांची वृद्धि

भारताच्या आयात-निर्यात व्यापाराची पाहणी करण्यांत आली आहे. ह्या पाहणीवरून असें दिसतें कीं, देशाच्या आयातीपैकी जवळजवळ एक तृतीयांश आयात आजमितीला आफ्रिका आणि आशिया ह्या देशांकडून करण्यांत येते. त्याचप्रमाणें भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या मालापैकी २५ टक्के मालाची निर्यात ह्याच देशांना करण्यांत येते. आफ्रिका आणि आशिया खंडांतील देशांशीं असणारे व्यापारी संबंध अधिकाधिक वाढविण्याचा प्रयत्न गेलीं कांहीं वर्षें भारत करीत आहे. आपल्या गरजा शक्यतोंवर ह्या देशांकडून माल आयात करून भागवाव्या आणि शक्य तितकी निर्यातहि त्याच देशांना करावी असें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. धोरण अंमलांत आणण्यासाठी व्यापारी करारांचा अवलंब करण्यांत आलेला आहे. १९६३ च्या प्रारंभीं भारताचे अशा प्रकारचे उभयपक्षी व्यापारी करार आफ्रिकेंतील व आशिआंतील १५ देशांशीं होते. ह्या देशांत सीलोन, संयुक्त अरब-प्रजासत्ताक, ब्रह्मदेश, इराण, इराक, जपान, जॉर्डन, नेपाळ, मोरोक्को आणि ट्यूनिशिआ ह्यांचा समावेश आहे. सीलोन आणि भारत ह्यांच्या दरम्यान नुकत्याच करण्यांत आलेल्या व्यापारी कराराप्रमाणें भारत सीलोनला ५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री व भांडवल माल पुरविणार आहे. ह्या मालाची किंमत मागाहून चुकती करण्यांत यावयाची आहे. आफ्रिका व आशिआंतील देशांकडून भारत अशुद्ध पेट्रोल, कच्चा ताग, तांबें, इत्यादि महत्त्वाचा माल आयात करतो. उलटपक्षीं भारत वरील देशांना सुती कापड, तागाचा पक्का माल, चहा, इत्यादि वस्तु निर्यात करतो.

---

## भारताला कॅनडाची लष्करी मदत

भारताची लष्करी वाहतुकव्यवस्था बळकट करण्यासाठी कॅनडा भारताला ३·५० कोटी डॉलर्स मदतीदाखल देण्याचा विचार करीत आहे. ह्या रकमेचा उपयोग वाहतुकीचीं विमानें खरेदी करण्यासाठी करावयाचा आहे. विमानांच्या साह्यानें सैनिक, दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें ह्यांची वाहतूक जलदीनें करतां येईल. कॅनडाच्या सरकारनें जरूर त्या विमानांच्या कारखान्याकडे ह्या बाबतींत चौकशी केली असून, भारताची गरज भागविण्यासाठी विमानांचें उत्पादन वाढवितां येईल, असें कारखान्यानें कळविलें आहे. विमानांचा पुरवठा करण्याचा करार भारत व कॅनडा ह्यांच्या दरम्यान करण्यांत येईल. करार ब्रिटन-अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीच्या कक्षेबाहेरचा असेल.


## चीन व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांचे बिघडलेले संबंध

चीन व झेकोस्लोव्हाकिया हे दोन्ही देश कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील आहेत. परंतु त्यांचे आर्थिक व राजकीय संबंध १९५९ सालापासून बिघडत चाललेले आहेत. १९५९ पूर्वीं झेकोस्लोव्हाकिआच्या एकूण परदेशीय व्यापारापैकी १० टक्के व्यापार चीनशीं होत असे. परंतु अलीकडे ह्या व्यापारांत घट होत चाललेली आहे. अजूनहि चीन झेकोस्लोव्हाकिआकडून कांहीं यंत्रांचे सुटे भाग घेतो. परंतु १९५९ पूर्वीं चीननें जी यंत्रसामग्री झेक देशाकडून घेतली आहे ती चालू ठेवण्यापुरतीच ही आयात करण्यांत येत आहे. चीनमध्यें गेल्या दोन-तीन वर्षांत अन्नधान्याचा व शेतीच्या इतर मालाचा तुटवडा असल्यानें चीन झेकोस्लोव्हाकिआला फारसा माल निर्यात करू शकत नाहीं. त्यामुळें उभयतां देशांत होणारा ऐनाजिनसी बदलाचा व्यापार जवळ जवळ थंडावला आहे. चीननें दीर्घ मुदतीचीं कर्जें घेण्याचें नाकारलें असल्यानें ह्या परिस्थितींत सुधारणा होण्याची फारसी आशा नाहीं. चीननें दिलेल्या नमुन्याप्रमाणें झेकोस्लोव्हाकिआनें कांहीं यंत्रसामग्री तयार केलेली होती. परंतु चीनला ती घेतां आली नाहीं. त्यामुळें ही यंत्रसामग्री पुन्हा वितळविण्यांत आली. १९५०-५१ सालानंतर झेकोस्लोव्हाकिआनें चीनला शस्त्रास्त्रें पुरविलेलीं नाहींत. १९५९ सालापूर्वी चीनमध्यें ३०० पेक्षा अधिक झेक तंत्रज्ञ काम करीत होते. आतां त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीहि नाहीं. चीनमधील झेक नागरिकांच्या हालचालींवर त्रासदायक निर्बंध घालण्यांत आलेले आहेत. शिवाय त्यांच्यावर पाळतहि ठेवण्यांत येत असते. ह्या परिस्थितीला कंटाळून बहुतेक झेक नागरिकांनीं चीनला रामराम ठोकला आहे. झेकोस्लोव्हाकिआंतील चिनी नागरिकहि परत जात आहेत.

---

## तंबाखूच्या निर्यातीचा उच्चांक

१९६२ च्या पहिल्या दहा महिन्यांत भारतानें तंबाखूच्या निर्यातींत उच्चांक गांठला आहे. ह्या कालावधींत सुमारें ५·५३ कोटी पौंड तंबाखू निर्यात करण्यांत आली. ह्या तंबाखूची किंमत अंदाजें १७ कोटी रुपये होते. उरलेल्या दोन महिन्यांत आणखी १ कोटी रुपये किंमतीची तंबाखू निर्यात करण्यांत आलेली असावी. भारताची तंबाखू घेणाऱ्या देशांत रशिआ, हंगेरी, युगोस्लाव्हिया, पोलंड ह्या देशांचा समावेश आहे. गेल्या वर्षीं पूर्व जर्मनीनेंहि प्रथमच भारतामधून तंबाखू आयात केली. रशियाला होणाऱ्या तंबाखूच्या निर्यातींत अलीकडे बरीच वाढ झालेली आहे. रशिआनें १९६१ सालीं भारतामधून जितकी तंबाखू आयात केली होती, त्याच्या तिप्पट तंबाखू १९६२ सालीं त्यानें आयात केली.

भिडे अँड सन्स
प्रा. लि.
शिवाजीनगर, सांगली.

## भारताच्या व्यापारी संबंधांची वृद्धि

भारताच्या आयात-निर्यात व्यापाराची पाहणी करण्यांत आली आहे. ह्या पाहणीवरून असें दिसतें कीं, देशाच्या आयातीपैकी जवळजवळ एक तृतीयांश आयात आजमितीला आफ्रिका आणि आशिया ह्या देशांकडून करण्यांत येते. त्याचप्रमाणें भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या मालापैकी २५ टक्के मालाची निर्यात ह्याच देशांना करण्यांत येते. आफ्रिका आणि आशिया खंडांतील देशांशीं असणारे व्यापारी संबंध अधिकाधिक वाढविण्याचा प्रयत्न गेलीं कांहीं वर्षे भारत करीत आहे. आपल्या गरजा शक्यतोंवर ह्या देशांकडून माल आयात करून भागवाव्या आणि शक्य तितकी निर्यातहि त्याच देशांना करावी असें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. धोरण अंमलांत आणण्यासाठी व्यापारी करारांचा अवलंब करण्यांत आलेला आहे. १९६३ च्या प्रारंभीं भारताचे अशा प्रकारचे उभयपक्षी व्यापारी करार आफ्रिकेंतील व आशिआंतील १५ देशांशीं होते. ह्या देशांत सीलोन, संयुक्त-अरब-प्रजासत्ताक, ब्रह्मदेश, इराण, इराक, जपान, जॉर्डन, नेपाळ, मोरोक्को आणि ट्यूनिशिआ ह्यांचा समावेश आहे. सीलोन आणि भारत ह्यांच्या दरम्यान नुकत्याच करण्यांत आलेल्या व्यापारी कराराप्रमाणें भारत सीलोनला ५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री व भांडवल माल पुरविणार आहे. ह्या मालाची किंमत मागाहून चुकती करण्यांत यावयाची आहे. आफ्रिका व आशिआंतील देशांकडून भारत अशुद्ध पेट्रोल, कच्चा ताग, तांबें, इत्यादि महत्त्वाचा माल आयात करतो. उलटपक्षीं भारत वरील देशांना सुती कापड, तागाचा पक्का माल, चहा, इत्यादि वस्तु निर्यात करतो.

## भारताला कॅनडाची लष्करी मदत


भारताची लष्करी वाहतुकव्यवस्था बळकट करण्यासाठी कॅनडा भारताला ३·५० कोटी डॉलर्स मदतीदाखल देण्याचा विचार करीत आहे. ह्या रकमेचा उपयोग वाहतुकीचीं विमानें खरेदी करण्यासाठी करावयाचा आहे. विमानांच्या साह्यानें सैनिक, दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें ह्यांची वाहतूक जलदीनें करतां येईल. कॅनडाच्या सरकारनें जरूर त्या विमानांच्या कारखान्याकडे ह्या बाबतींत चौकशी केली असून, भारताची गरज भागविण्यासाठी विमानांचें उत्पादन वाढवितां येईल, असें कारखान्यानें कळविलें आहे. विमानांचा पुरवठा करण्याचा करार भारत व कॅनडा ह्यांच्या दरम्यान करण्यांत येईल. करार ब्रिटन-अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीच्या कक्षेबाहेरचा असेल.

## चीन व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांचे बिघडलेले संबंध

चीन व झेकोस्लोव्हाकिया हे दोन्ही देश कम्युनिस्ट राष्ट्र-गटांतील आहेत. परंतु त्यांचे आर्थिक व राजकीय संबंध १९५९ सालापासून बिघडत चाललेले आहेत. १९५९ पूर्वी झेकोस्लोव्हाकिआच्या एकूण परदेशीय व्यापारापैकी १० टक्के व्यापार चीनशीं होत असे. परंतु अलीकडे ह्या व्यापारांत घट होत चाललेली आहे. अजूनहि चीन झेकोस्लोव्हाकिआकडून कांहीं यंत्रांचे सुटे भाग घेतो. परंतु १९५९ पूर्वी चीननें जी यंत्रसामग्री झेक देशाकडून घेतली आहे ती चालू ठेवण्यापुरतीच ही आयात करण्यांत येत आहे. चीनमध्यें गेल्या दोन–तीन वर्षांत अन्नधान्याचा व शेतीच्या इतर मालाचा तुटवडा असल्यानें चीन झेकोस्लोव्हाकिआला फारसा माल निर्यात करू शकत नाहीं. त्यामुळें उभयतां देशांत होणारा ऐनजिनसी बदलाचा व्यापार जवळ जवळ थंडावला आहे. चीननें दीर्घ मुदतीचीं कर्जे घेण्याचें नाकारलें असल्यानें ह्या परिस्थितींत सुधारणा होण्याची फारसी आशा नाहीं. चीननें दिलेल्या नमुन्याप्रमाणें झेकोस्लोव्हाकिआनें कांहीं यंत्रसामग्री तयार केलेली होती. परंतु चीनला ती घेतां आली नाहीं. त्यामुळें ही यंत्रसामग्री पुन्हा वितळविण्यांत आली. १९५०-५१ सालानंतर झेकोस्लोव्हाकिआनें चीनला शस्त्रास्त्रें पुरविलेलीं नाहींत. १९५९ सालापूर्वी चीनमध्यें ३०० पेक्षा अधिक झेक तंत्रज्ञ काम करीत होते. आतां त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीहि नाहीं. चीनमधील झेक नागरिकांच्या हालचालींवर त्रासदायक निर्बंध घालण्यांत आलेले आहेत. शिवाय त्यांच्यावर पाळतहि ठेवण्यांत येत असते. ह्या परिस्थितीला कंटाळून बहुतेक झेक नागरिकांनीं चीनला रामराम ठोकला आहे. झेकोस्लोव्हाकिआंतील चिनी नागरिकहि परत जात आहेत.

## तंबाखूच्या निर्यातीचा उच्चांक

१९६२ च्या पहिल्या दहा महिन्यांत भारतानें तंबाखूच्या निर्यातींत उच्चांक गांठला आहे. ह्या कालावधींत सुमारें ५·५३ कोटी पौंड तंबाखू निर्यात करण्यांत आली. ह्या तंबाखूची किंमत अंदाजें १७ कोटी रुपये होते. उरलेल्या दोन महिन्यांत आणखी १ कोटी रुपये किंमतीची तंबाखू निर्यात करण्यांत आलेली असावी. भारताची तंबाखू घेणाऱ्या देशांत रशिआ, हंगेरी, युगोस्लाव्हिया, पोलंड ह्या देशांचा समावेश आहे. गेल्या वर्षी पूर्व जर्मनीनेंहि प्रथमच भारतामधून तंबाखू आयात केली. रशियाला होणाऱ्या तंबाखूच्या निर्यातींत अलीकडे बरीच वाढ झालेली आहे. रशिआनें १९६१ सालीं भारतामधून जितकी तंबाखू आयात केली होती, त्याच्या तिप्पट तंबाखू १९६२ सालीं त्यानें आयात केली.

भिडे अँड सन्स
प्रा. लि.
शिवाजीनगर, सांगली.

फोन नं. २४४  रजि. नं. २४०९८  टेलिग्राम—" जनताबँक "

—:अल्पावधींतच जनतेच्या विश्वासास पात्र झालेली:—

# जनता सहकारी बँक लिमिटेड, सांगली.

कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | ... | रु. १,६८,३५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | ... | रु. ११,३०९ |
| एकूण ठेवी | ... | ... | रु. १०,१२,५३६ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | ... | रु. २१,६४,१७८ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. आकर्षक व्याजानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

संपूर्ण सेवा—संपूर्ण सुरक्षितता

खास वैशिष्ट्यें—[ ज ] दुसऱ्याच वर्षी बँकेस निव्वळ नफा रु. १४,६६२–९० झाला आहे.
[ न ] बँकेनें २ टक्के डिव्हिडंड जाहीर केलें.
[ ता ] गत सालची एकूण उलाढाल. रु. ३,१८,१८,५२६ ची झाली आहे.

एस्. एस्. पांड्याजी: मॅनेजर  वसंतरावजी पाटील व्हा. चेअरमन  एम्. एस्. कराळे चेअरमन

दातांच्या स्वच्छतेसाठी

## ★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

१ वर्ष ३¾%  ३ वर्षें ४¼%
२ वर्षें ४%  ४ वर्षें ४½%
५ वर्षें ५%

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था

बँकेच्या शाखा : सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर अॅड्व्होकेट, चेअरमन  के. डी. शिराळकर मॅनेजर

## दि सांगली बँक लि.

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक सांगली

शेड्यूल्ड बँक ]  [ स्थापना १९१६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,३०० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. १०,००,३०० |
| वसूल भांडवल | रु. ५,५०,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ८,२८,७२३ |
| खेळतें भांडवल | रु. ३·७५ कोटीचे वर |

महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २२ शाखा

आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.

हेड ऑफिस :—सांगली व इचलकरंजी आणि रविवार पेठ, पुणें

या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केलेली आहे.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

*समक्ष भेटा अगर लिहा.*

हेड ऑफिस राजवाडा चौक सांगली }  एम्. के. गुते, मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.